REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १३ नोव्हेंबर, १९४० अंक ४५

— दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि. पुणें २. —

— चालू हंगामाचा —

शुभ्र व दाणेदार साखऱ्या

– विक्री एजन्सी दिलेली नाहीं. –

खरेदीचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावरः—

पत्ता
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड
पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे
बी. ए; एलएल. बी.,
मॅनेजिंग एजन्ट.

रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

# विविध माहिती

### जपानची दशवार्षिक योजना

जपान देशास सर्व बाबतींत स्वयंपूर्ण करण्याची एक दशवार्षिक योजना तेथील सरकारनें आखली आहे.

### ट्रेझरी बिलांवर १२ आ. ६ पै व्याज

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १२ आ. ६ पै पडला.

### चेक्सची देवघेव

१ नोव्हेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १० कोटि, ९७ लक्ष रुपये किंमतीच्या ७२,३९३ चेक्सशी देवघेव झाली.

### हिंदुस्थानाबाहेर पैसे पाठविण्यावर नियंत्रण

कोणीहि, रिझर्व्ह बँक सांगेल त्यापेक्षा मोठी रकम ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर नेतां अगर पाठवितां कामा नये, असा कायदा करण्यांत आला आहे.

### कलकत्ता येथील पाण्याचा खप

कलकत्ता शहराची लोकसंख्या १२ लक्ष, ५० हजार असून तेथील रोजचा फिल्टर केलेल्या पाण्याचा खप ७ कोटि गॅलन आहे. म्हणजे, दरमाणशीं रोजचा खप ५६ गॅलन होतो.

### मुंबई कार्पोरेशन

मुंबई कार्पोरेशनला १९४१–४२ मध्यें ३ कोटि, ५२ लक्ष रुपये उत्पन्न होऊन कॉर्पोरेशनचा खर्च ३ कोटि, ७७ लक्ष रुपये होईल, असा बजेटांतील अंदाज आहे.

### लक्ष्मी बँक लि.

अकोला येथील लक्ष्मी बँकेच्या मुंबई शाखेचें उद्घाटन ता. ६ रोजीं झालें. बँकेच्या नागपूर, खामगांव, अमरावती व गोंदिया येथें शाखा आहेत.

### लष्करवाढ

१ ऑक्टोबर, १९४० अखेर ३२० युरोपियनांस व ५१६ हिंदी लोकांस लष्करी इमर्जन्सी कमिशनें देण्यांत आलीं. सप्टेंबर १९३९ ते सप्टेंबर १९४० ह्या मुदतींत हिंदुस्थानांत लष्करभरती करण्यांत आली, त्यांत ४,६७१ पठाण, २४,१४८ पंजाबी मुसलमान, ११,६०५ शीख, ३,२०९ गुरखे, ३,९९७ रजपूत, ५,३०७ जाट व ५,१६४ मराठा सैनिक आहेत.

### मद्रास को. लँड मॉर्गेज बँकेचीं डिबेंचर्स

मद्रास को. सेंट्रल लँड मॉर्गेज बँकेनें ३½% चीं डिबेंचर्स काढलीं आहेत, त्यांचें मुद्दल व व्याज ह्यांची सरकारनें हमी घेतली आहे. डिबेंचर्सची मुदत २० वर्षें आहे. डिबेंचर्स ट्रस्ट सिक्युरिटीज असून १९३८ च्या विमा कायद्याचीहि त्यांस मान्यता आहे.

### मुंबई प्रांतांतील गुन्हेगार जाती

बागडी, छप्परबंद, फुतगुडी, कम्मी, कटबू आणि वणजीर अशा गुन्हे करणाऱ्या सहा जातींचीं नांवें गुन्हे करणाऱ्या जातींच्या यादींतून काढून टाकण्यांत येऊन त्या लोकांना सेटलमेंटमधून सोडून देण्यांत आलें. बेरड, भिल्ल, कोळी, कमाणी, बडूर व वाघरी यांसारख्या इतर जातींनीं अलिकडील वर्षांत प्रगति दाखविली आहे व म्हणून त्या जातींचीं नांवें यादींतून काढून टाकावींत किंवा कसें हें ठरविण्याच्या हेतूनें त्या जातींतील गुन्हे करण्याच्या प्रमाणाची पाहणी करण्यांत येत आहे.

### हिंदी गिरण्यांतील कपास

१९३८–३९ मध्यें हिंदी कपाशीच्या २८ लक्ष, ५८ हजार गाठी हिंदी गिरण्यांत दाखल झाल्या, त्यांतील ५२% कपास ⅞ इंच अगर त्यापेक्षा लांब धाग्याची व ४८% कपास ⅞ इंचापेक्षा आंखूड धाग्याची होती.

### मध्य विभागांतील म्युनिसिपालिट्या

मुंबई प्रांताच्या मध्यविभागांत ५८ शहरांना म्युनिसिपालिट्या असून त्यांच्या हद्दींत एकूण १० लक्ष ३१ हजार लोक रहातात. १९३८–३९ मध्यें ह्या म्युनिसिपालिट्यांस एकंदर ९४ लक्ष, १३ हजार रुपये उत्पन्न झालें. कराचें दरमाणशीं प्रमाण ४ रु. १५ आ. ३ पै पडलें. सर्व म्युनिसिपालिट्यांस मिळून ४५ लक्ष रुपये कर्ज आहे.

### जंगल खात्याचें उत्पन्न

मुंबई सरकारच्या जंगल खात्यास १९३९–४० मध्यें ३८ लक्ष, ६१ हजार रुपये उत्पन्न झालें. त्याचे मागच्या वर्षी तें ३८ लक्ष, ६१ हजार रुपये झालें होतें.

### युद्धकर्जें

२ नोव्हेंबर अखेर, हिंदुस्थान सरकारच्या ३% डिफेन्स बाँड्सची २७ कोटि, २१ लक्ष रुपयांची विक्री झाली आहे. बिनव्याजी रोख्यांत लोकांनीं २ कोटि, १७½ लक्ष रुपये गुंतविले आहेत व १ कोटि, २६ लक्ष रुपयांचीं पो. ऑ. डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें खपलीं आहेत.

### मि. चेंबर्लेन ह्यांचा मृत्यु

ग्रेट ब्रिटनचे माजी मुख्य प्रधान, मि. चेंबर्लेन, हे गेल्या शनिवारीं मृत्यु पावले.

### मि. ईडन ह्यांची नव्या युद्धक्षेत्रास भेट

ब्रिटिश युद्धमंत्रि, मि. ईडन, हे इजिप्त व मध्य एशिया येथें नुकतेच जाऊन आले. त्यांनीं सुमारें १२ ते १५ हजार मैल प्रवास केला.

### रिझर्व्ह बँकेचे नवे डायरेक्टर

सर राघवेंद्रराव ह्यांची रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली आहे.

### कालवा खोदून जिब्राल्टरचें बेट बनविलें

युरोपच्या भूमीस जिब्राल्टरला जोडणारा सडक फोडून, जिब्राल्टरचें बेटांत रूपांतर करण्यांत आलें आहे अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. ह्या नवीन कालव्यामुळें जिब्राल्टरवर जमिनीचे बाजूनें हल्ला करणें शत्रूस अशक्य होणार आहे.

### वार्षिक कॉफीपान

हिंदुस्थानांतील लोकांचें दरसाल दरमाणशीं सरासरी कॉफीपान सात पेले होतें. मुंबई, संयुक्त प्रांत व पंजाब ह्यांखेरीज बाकी सर्व प्रांतांत कॉफीपानाचा प्रसार होत आहे. एकट्या मद्रास प्रांतांत कॉफीचीं १४ हजार दुकानें आहेत.

### कॉफीची लागवड

कॉफीचें जागतिक वार्षिक उत्पादन १०० कोटि रुपये किंमतीचें भरतें, त्यांतील हिंदी उत्पादनाचा वांटा १½ कोटि रुपयांचा आहे. हिंदुस्थानांत एकूण २ लक्ष एकर जमीन कॉफीखालीं असून १ लक्ष लोकांची उपजीविका त्यावर अवलंबून आहे.

### साखरेच्या निर्यातीस परवानगी

आंतरराष्ट्रीय साखर-कराराप्रमाणें हिंदुस्थानास साखर निर्गत करण्याची परवानगी नाहीं. ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपणाऱ्या वर्षांत हिंदुस्थानास २ लक्ष टन साखर ग्रेट ब्रिटनकडे निर्गत करण्यास परवानगी मिळावी, ही हिंदुस्थान सरकारची विनंति मान्य झाली आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५६६ |
| २ बँका व विमा कंपन्या | ५६७ |
| ३ कालव्यांच्या पाण्याखालील पिकें ... ... | ५६८ |
| ४ हिंदुस्थानांतील टेलिफोन | ५६८ |
| ५ स्फुट विचार ... | ५६९ |
| पुरवणी फिनॅन्स बिलांतील करवाढ—रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती—प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची फेर निवडणूक—हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक संरक्षणाबाबत धोरण—सासर समितीची दिल्ली येथें बैठक—इंग्लंडमध्यें छोट्या चलनी नोटांची तरतूद | |
| ६ प्रांतिक सहकारी बँक ही शेतकऱ्यांची बँक आहे | ५७१ |
| ७ मालाच्या आगबोटींची वहातूक ... ... | ५७२ |
| ८ मध्यप्रांत–वऱ्हाडांतील सहकारी बँकांतील ठेवी | ५७३ |
| ९ हिंदी ब्रॉडकास्टिंगची प्रगति ... ... | ५७३ |
| १० मुंबई प्रांतांतील शिक्षण प्रगति ... ... | ५७४ |
| ११ निवडक बाजारभाव | ५७५ |



# अर्थ

बुधवार, ता. १३ नोव्हेंबर, १९४०


## बँका व विमाकंपन्या

### युद्धकालीन अडचणी

सामान्यत: बँका व विमाकंपन्या ह्यांचे व्यवहार शास्त्रशुद्ध व अनुभवजन्य तत्त्वांनुसार चालतात व ते तसे चालले तर त्यांच्या नफ्यांत फारसा चढउतार न होतां त्यांस आपल्या भागीदारांस संतुष्ट राखतां येते. ज्या राष्ट्रांत औद्योगिक प्रगति होत आहे तेथें तर वरील दोन्ही धंद्यांत क्रमाक्रमानें वाढता नफा होण्याची अपेक्षा असते. हिंदुस्थानचा अनुभवहि बहुतांशीं असाच आहे. परंतु युद्ध सुरू झाल्यापासून दोन्ही प्रकारच्या कंपन्यांच्या भागांचे भाव उतरूं लागले आहेत. युद्धकालीं व तदनंतर ह्या दोन्ही धंद्यांची परिस्थिति कशा तऱ्हेची असण्याचा संभव आहे, ह्याबद्दल थोडें विवेचन केल्यास तें उपयुक्त ठरेल.

बँकिंग व विमा हे दोन्ही धंदे पैशाच्या आयव्ययासंबंधींचे असल्यानें चलनविषयक धोरणाचा त्यांच्या परिस्थितीवर तात्काल परिणाम होतो. जोंपर्यंत सरकारी धोरण चलनांत नियमित वाढ करण्याचें आहे तोंपर्यंत सरकारी कर्जरोख्यांवरील व्याजाचे दर विशेष वाढण्याचा संभव नाहीं. ज्या देशांत उद्योगधंदे व परराष्ट्रीय कर्जे ह्यांवर सरकारी नियंत्रण आहे तेथें तर व्याजाचे दर विशेषच पडलेले दिसतात. हिंदी उद्योगधंद्यांची ज्या प्रमाणांत वाढ होईल त्या प्रमाणांत बँकांना पैसे गुंतविण्याचे किफायतशीर मार्ग अधिक सापडूं शकतील व त्या प्रमाणांत त्यांची परिस्थिति सुधारेल. विमा कंपन्यांचे बरेचसे पैसे सरकारी रोख्यांत गुंतवावे लागत असल्यानें व पूर्वीच्या अपेक्षेहून ह्या रोख्यांत कमी उत्पन्न सुटत असल्यानें ह्या कंपन्यांची स्थिति एवढ्या गोष्टी पुरती तरी तात्काळ सुधारणें संभवनीय नाहीं. रोख्यांवरील व्याजाचे दर वाढल्यास नव्या खरेदीवर विमाकंपन्यांसहि अधिक कमाई होईल हें खरें. तरी एकंदरींत युद्धकालीं बँकांच्या मानानें विमाकंपन्यांची कमाई कमी असण्याचाच अधिक संभव आहे.

हिंदुस्थानांत प्रत्यक्ष लढाई सुरू झालेली नाहीं. तसेंच, मोठमोठ्या शहरांसहि अजून तरी विमानी हल्ल्यांचें भय उत्पन्न झालें नाहीं. ह्या स्थितींत वाढत्या मृत्युसंख्येमुळें विमाकंपन्यांस येणारें नुकसान येथें सोसावें लागण्याची भीति नाहीं. बँका व विमा कंपन्या ह्या दोहोंमध्यें युद्धकालीं दुसराहि एक फरक निर्माण होत आहे. बँकांकडे येणाऱ्या ठेवींचें मान कमी न होतां उलट चलनविषयक सरकारी धोरण अधिक सढळ असल्यानें त्यांस खेळत्या भांडवलाचा तुटवडा भासत नाहीं. विमा उतरणारांची संख्या मात्र युद्धकालीन अनिश्चिततेमुळें कमी होऊन विमाकंपन्यांच्या हातांतील खेळतें भांडवल कमी होत जातें.

विमाकंपन्यांचा बराचसा पैसा दीर्घ मुदतीच्या कर्जरोख्यांत गुंतलेला असल्यानें व्याजाच्या दरांतील फेरबदलामुळें त्यांच्या शिलकांतील कर्जरोख्यांच्या किंमतींतहि फरक होतो. गेल्या महायुद्धांत व्याजाचे दर फार वाढल्यानें कर्जरोख्यांच्या शिलकांची बाजारी किंमत फार झपाट्यानें घसरत चालली. ह्या युद्धांत वाढत्या व्याजाच्या दराचा फायदाहि नाहीं, तर उलट कर्जरोख्यांवरील घसाऱ्यानें उत्पन्न होणारी अडचणहि नाहीं. सर्व आर्थिक व्यवहारांचें नियमन सरकारमार्फत फार जोरानें सुरू आहे. बाजारभाव, चलनपुरवठा व व्याजाचे दर ह्या सर्वांचें नियमन केल्यानें धंद्याच्या कमाईचेंहि सहजच नियमन होत आहे. दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं इतर देशांत नियमन हा पद्धतशीर नियोजनाचा एक भाग असून सर्व धंद्यांत वाजवी कमाई होण्याची अप्रत्यक्ष हमी सरकार घेतें. हिंदुस्थानांत अनेक धंद्यांत, विशेषत: शेतकीमध्यें, कमाई घटत आहे, त्याबद्दल कांहींच केलें जात नाहीं. बँका व विमाकंपन्या ह्यांकडेहि त्यांच्या कमाईच्या दृष्टीनें आजवर लक्ष पुरविलें गेलें नसून आतां कोठें नियमन सुरू आहे.

प्राप्तीवरील कर व उद्योगधंद्यांवरील इतर कर ह्यांमध्यें होणाऱ्या वाढीनेंहि वरील धंद्यांची कमाई घटत आहे. व्याजाच्या अगर नफ्याच्या रूपानें कमाई न वाटतां ती धंद्यांतच अनेक मार्गांनीं विशिष्ट हेतूंकरितां ठेवी उत्पन्न करून मुरवावी असा प्रयत्न अनेक धंद्यांत केला जातो. परंतु करासंबंधींच्या सरकारी कायद्यांत अशा प्रकारांना आळा घालण्याची व्यवस्था असते. शिवाय कांहीं वर्षें ठेवी वाढविल्या तरी जोंपर्यंत धंद्यांत घातलेलें भांडवल हें भागीदारांना नफा मिळण्याकरितां आहे तोंपर्यंत त्यांस प्रतिवर्षी नफ्याची वाटणी केलीच पाहिजे. वाढते कराचे दर हे केवळ प्रासंगिक आहेत असें समजून कित्येक धंदे आपल्या कमाईपैकीं मोठाले भाग आपल्याच धंद्यांत मुरविण्याची खटपट करीत आहेत, हें साहजीक आहे. परंतु करांचे दर उतरण्याचा संभव कमी आहे हें पाहिलें तर वरील धंद्यांच्या पैसे मुरविण्याच्या धोरणानें बँकांचें व अप्रत्यक्षपणें विमाकंपन्यांचें मात्र नुकसान होत आहे असें म्हटलें पाहिजे.

युद्धकालीं सामान्यत: विमाकंपन्यांहून बँकांची स्थिति बरी राहील हें गृहीत धरूनहि असें म्हटलें पाहिजे कीं, सध्याच्या आर्थिकदृष्ट्या निष्कृष्ट व राजकीय बाबतींत नियमनाच्या कालांत कमी नफ्याच्या अपेक्षेनेंच सर्व धंद्यांनीं आपापली संघटना सुधारणें बरें. ज्यांची संघटना कार्यक्षम व कमी खर्चाची आहे त्यांस तोटा येण्याचा धोका कमी व उलट परिस्थिति सुधारतांच चांगला नफा होण्याचा संभव आहे.

# कालव्यांच्या पाण्याखालील पिकें

. हिंदी कालवे व पाटबंधारे ह्यांचे कामांत सरकारचे सुमारें १५४ कोटि रुपये गुंतले असून त्यावर सरासरीनें ६% व्याज सुटतें. ब्रिटिश हिंदुस्थानांत शेतीस पाणी पुरविण्याच्या सुमारें २७५ योजना चालू आहेत, त्यांपैकीं सुमारें ७० मोठ्या प्रमाणावरील आहेत. सर्व प्रांतांत पाटबंधाऱ्यांचे बाबतींत पंजाबचा अनुक्रम पहिला लागतो. त्याचे खालोखाल मद्रास, सिंध, संयुक्त प्रांत, हे प्रांत येतात. पंजाबांतील पाटबंधाऱ्यांत गुंतलेल्या भांडवलावर सर्वांत चांगलें म्हणजे १४·५% व्याज सुटतें. खालील तक्त्यांत एकूण पिकाखालील जमिनी कालव्याखालील जमिनी, बांधकामांत गुंतलेली रक्कम, सरकारी कालव्याखालील जमिनींत येणाऱ्या पिकांची किंमत, इत्यादि माहिती दिली आहे:—

| १<br>प्रांत | २<br>लागवडीखालील एकूण जमीन ( एकर ) | ३<br>सरकारी कालव्याखालील लागवडीची जमीन(एकर) | नं. ३ चें नं·२ शीं प्रमाण% | पाटबंधाऱ्यांसाठी सरकारी भांडवली खर्च (लक्ष रु. ) | नं. ३ मधील पिकांची किंमत ( लक्ष रु. ) |
|---|---|---|---|---|---|
| मद्रास | ३,६५,९७,४०० | ७३,२७,६०० | २०·०२ | २,०१६ | २,०१७ |
| मुंबई | २,७८,३४,४८० | ४,७०,१०० | १·६९ | १,०७५ | २३१ |
| बंगाल | २,९४,०३,४०० | २,०१,७०० | ०·६८ | ५३१ | १११ |
| संयुक्तप्रांत | ३,५५,३८,००० | ३८,३६,९०० | १०·८० | २,८६१ | २,०१३ |
| पंजाब | ३,२६,४३,३०० | १,१९,४१,२०० | ३६·५० | ३,४९२ | ४,७४१ |
| ब्रह्मदेश | १,८४,०२,००० | २१,८४,२०० | ११·८५ | ६९८ | ६२० |
| बिहार | २,४४,८७,३०० | ६,७५,५०० | २·७ | ३५६ | २५४ |
| मध्यप्रांत(वहारखेरीज) | २,०९,३४,००३ | ३,१५,००० | १·५० | ६७९ | ९३ |
| वायव्य सरहद्दप्रांत | २७,०६,३०० | ४,६१,१०० | १७·०४ | ३२० | १४६ |
| ओरिसा | ६४,८६,३०० | ३,१४,६०० | ४·८५ | ३२९ | १३२ |
| सिंध | ५२,१५,५०० | ४४,८६,५०० | ८६·०२ | २,९७५ | १,०५८ |
| रजपुताना | ३,६५,६०० | १९,९०० | ५·४५ | ३६ | ४ |
| बलुचिस्थान | ४,१५,६०० | २१,१०० | ५·०७ | ३६ | ३ |
| एकूण | २४,१०,२९,१०० | ३,२२,५६,१०० | १३·३८ | १५,४०४ | ११,४२३ |

### टेलिफोनच्या बाबतींत हिंदुस्थानचा मागासलेपणा

पुढारलेल्या देशांत टेलिफोनचा प्रसार किती मोठ्या प्रमाणावर झालेला आहे, हें खालील आकड्यांवरून समजेल:—

| देश अगर शहर | टेलिफोन्सची संख्या (लक्ष) | दर शंभर वस्तीस किती टेलिफोन ? |
|---|---|---|
| अमेरिका | १८४½ | १४·४९ |
| डेन्मार्क | ४ | १०·८९ |
| जर्मनी | ३४½ | ५· ८ |
| फ्रान्स | १५ | ३·५१ |
| जपान | १२ | १·७० |
| वॉशिंग्टन | २ | ३७·४२ |
| ऑस्लो | ½ | २२·२९ |
| पॅरीस | ४½ | १५·१२ |
| बर्लिन | ५½ | १२·९७ |
| लंडन ( परगण्यासह ) | ९½ | १५·८७ |
| टोकियो | २½ | ३·८८ |

हिंदुस्थानांत सुमारें ७५ हजार टेलिफोन असून त्यांपैकी सुमारें ४५ हजार लायसेन्स असलेल्या कंपन्यांनीं दिलेले आहेत. हिंदुस्थानांत प्रत्येक ५,००० वस्तीस १ टेलिफोन, असें प्रमाण पडतें. कलकत्ता हें ब्रिटिश साम्राज्यांतील दुसऱ्या प्रतीचें शहर आहे, परंतु तेथें, १०० वस्तीस १ टेलिफोनपेक्षा अधिक टेलिफोन वापरांत येत नाहीं. हिंदी पोस्ट आणि टेलिग्राफ खातें टेलिफोन लोकप्रिय करण्याचा कसून प्रयत्न करीत आहे.

जगांतील एकूण टेलिफोन्सपैकी सुमारें निम्मे टेलिफोन एकट्या अमेरिका देशांत आहेत. सबंध एशिया खंडांत मिळून ४·६% टेलिफोन आहेत आणि त्यांपैकीं बहुसंख्य जपानांत आहेत. दर शंभर वस्तीच्यामागें पडणाऱ्या टेलिफोन्सच्या संख्येच्या दृष्टीनें शहरांचा अनुक्रम पुढील प्रमाणें लागतोः—वॉशिंग्टन, स्टॉकहोम, न्यूयॉर्क, लंडन, पॅरिस, बर्लिन, रोम, टोकियो, मॉस्को.

### शिरगणतीची पूर्वतयारी

येत्या शिरगणतीचे वेळीं लोकांकडून भरून घ्यावयाच्या माहितीच्या ३५ कोटि, ७० लक्ष चिठ्या कलकत्ता येथें छापून घेऊन सर्व प्रांतांकडे पाठविण्यांत आल्या आहेत.

### हिंदी कपाशीस नवीन बाजारपेठा

हिंदी कपाशीची युरोपांतील बाजारपेठ चालू युद्धामुळें बंद झाली आहे. तिचे जागीं नवीन बाजारपेठा मिळविण्यासाठी कपाशीच्या निर्गतीची व्यवस्था करणारी एक स्वतंत्र संस्था निर्माण होण्याचा संभव आहे.

# स्फुट विचार

## पुरवणी फिनॅन्स बिलांतील करवाढ

हिंदी मध्यवर्ती असेंब्लीस गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेसमन, ह्यांनीं पुरवणी फिनॅन्स बिल सादर केलें, त्यांत इनकम टॅक्समध्यें ( ह्यांत सुपरटॅक्स व कॉर्पोरेशन टॅक्स ह्यांचाहि समावेश होतो ) २५% वाढ सुचविण्यांत आली आहे. ह्या सरचार्जमुळें सरकारचें वार्षिक उत्पन्न ५ कोटि रुपयांनीं वाढेल, अशी अपेक्षा आहे. टपालाचे दरांतहि वाढ सुचविण्यांत आली असून हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत पाठविण्याच्या पाकिटास, फिनॅन्स बिल मंजूर झाल्यानंतर, १¼ आणा पडणार आहे. बुकपोस्टास सध्या पहिल्या पांच तोळ्यांस दोन पैसे पडतात, ते ह्यापुढें तीन पैसे पडतील. हिंदुस्थानांतील साध्या तारेवर एक आणा व एक्सप्रेस तारेवर दोन आणे अशी पट्टी बसविण्यांत यावयाची असून ट्रंक टेलिफोनचे दरांत १०% वाढ होणार आहे. वाढत्या युद्धखर्चामुळें उत्पन्न-खर्चांत तूट पडणें स्वाभाविक आहे व ही तूट प्रस्तुत करवाढीनें अंशतः भरून निघेल. ह्यापुढें आणखीहि करवाढ करावी लागेल. सध्यासारख्या परिस्थितींत तात्काळ उत्पन्न वाढेल, अशीच करवाढ करणें क्रमप्राप्त असतें; परंतु कराच्या बोजाची वाटणी मनुष्याच्या ऐपतीप्रमाणें शक्य तेवढी होणेंहि आवश्यक आहे. येत्या बजेटांत आणखी करवाढ होणार असल्याची सूचना फडणविसांनीं आपल्या भाषणांत केलेलीच आहे.

---

## रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती

रिझर्व्ह बँक ॲक्टाप्रमाणें प्रत्येक शेड्यूल्ड बँकेस रिझर्व्ह बँकेंत आपल्या चालू व मुदती ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत रकम ठेवावी लागते व ह्या निश्चित प्रमाणापेक्षा कमी रकम झाली तर रिझर्व्ह बँकेस शेड्यूल्ड बँकेकडून दंडादाखल व्याज वसूल करतां येतें. प्रत्येक शेड्यूल्ड बँकेनें तिनें स्वीकारलेल्या मुदती ठेवींच्या देण्याच्या २ टक्क्यांइतकी व चालू खात्यावरील ठेवींच्या देण्याच्या ५ टक्क्यांइतकी रकम रिझर्व्ह बँकेंत शिलक ठेवली पाहिजे व ही शिलक ठराविक रकमेपेक्षा कमी भरली तर तूट आलेल्या रकमेवर तुटीच्या दिवसांकरितां दंडादाखल बँक रेटपेक्षा ३ टक्के ज्यास्त दरानें व्याज द्यावें लागतें व त्याच्या पुढच्या आठवड्यांत बँक रेटपेक्षा ५ टक्के अधिक दरानें व्याजाचा हिशेब केला जातो. हें व्याज द्यावयाचें बँकेनें कबूल केल्यास, तिला रिझर्व्ह बँकेजवळील आपली रकम काढून घेतां येते. परंतु ही गोष्ट गैर आहे व ठेवीदारांचे हितसंबंध आणि बँकिंगचें मूळ तत्त्व ह्यांस ती विघातक आहे. रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाच्या नजरेस कायद्यांतील ही पळवाट आली व त्याचा परिणाम म्हणजे रिझर्व्ह बँक कायद्यांत ह्याबाबत सुधारणा करणारें बिल असेंब्लींत मांडण्यांत आलें आहे. जोंपर्यंत शेड्यूल्ड बँकेचे पुरेसे पैसे रिझर्व्ह बँकेकडे राखलेले नाहींत, तोंपर्यंत तिला नवीन ठेवी घेतां येऊं नयेत व पुरेसे पैसे न राखण्यास जो डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट, मॅनेजर अगर सेक्रेटरी जाणूनबुजून कारणीभूत झाला असेल, त्यास ५०० रुपयांपर्यंत दंड व गुन्हा चालू राहीपर्यंत दररोज ५०० रुपयांपर्यंत दंड व्हावा, अशी ह्या बिलानें दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

---

## प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची फेरनिवडणूक

अमेरिकेच्या प्रेसिडेंटच्या जागेवर मि. रूझवेल्ट ह्यांची निवडणूक नुकतीच झाली, ह्या गोष्टीस सध्याच्या युद्धपरिस्थितींत विशेष प्रकारचें महत्त्व आहे. प्रेसिडेंट म्हणून निवडले जाण्याची मि. रूझवेल्ट ह्यांची ही तिसरी खेप आहे. एकाच पुढाऱ्यास प्रेसिडेंटच्या गादीवर तीन वेळां बसण्याची प्रथा अमेरिकेंत नाहीं आणि विलक्षण अपवाद म्हणूनच ती गणली जाणार. अमेरिकन राष्ट्र प्रजासत्ताक लोकशाही पद्धतीचें आहे आणि एका पुढाऱ्याच्या हातीं ओळीनें बारा वर्षे राज्यसूत्रें देण्याचा प्रकार त्या घटनेच्या तत्त्वास धरून नाहीं. तथापि, मि. रूझव्हेल्ट ह्यांची प्रेसिडेंटच्या जागीं तिसऱ्यांदा निवडणूक अमेरिकन जनतेनें केली आहे, ही गोष्ट त्यांच्या अपूर्व लोकप्रियतेचें लक्षण आहे. ते डेमोक्रॅट पक्षाचे अध्वर्यू आहेत आणि रिपब्लिक पक्षानें मि. विल्की ह्यांस आपले उमेदवार म्हणून त्यांच्या विरुद्ध उभें केलें होतें. मि. रूझव्हेल्ट ह्यांचा विशेष ओढा प्रस्तुत युद्धांत इंग्लंडच्या बाजूस आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. मि. विल्की हेहि इंग्लंडला युद्धसहाय देण्यास प्रतिकूल नाहींत. तथापि, अमेरिकेनें युद्धांत पडूं नये अशा मताचे अनेक लोक त्या देशांत असून मि. रूझव्हेल्ट ह्यांच्या, ग्रेट-ब्रिटनच्या पक्षपाती धोरणास मनःपूर्वक पाठिंबा देण्यास ते कचरत असल्यानें मि. विल्की ह्यांस निवडणुकींत जय मिळतो कीं काय अशी थोडीशी भीति उत्पन्न झाली होती. तथापि, मि. रूझव्हेल्ट ह्यांनीं पराराष्ट्रीय धोरण इतकें घडाडीनें पण सावधगिरीनें अमलांत आणलें आहे कीं सध्याच्या कठिण युद्धप्रसंगीं अमेरिकन जनतेनें त्यांच्यावरच विश्वास टाकला आहे हें समाधानकारक आहे. अमेरिकन संघाच्या बाजूस जर्मनीस यत्किंचितहि सहानुभूति मिळणें आतां सर्वस्वी अशक्य झालें आहे. ह्या दृष्टीनें पहातां मि. रूझवेल्ट ह्यांची तिसऱ्यांदा प्रेसिडेंट म्हणून निवडणूक करण्यांत अमेरिकन राष्ट्रानें दूरदर्शीपणाचें धोरण अवलंबल्याबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

---

## हिंदुस्थान-सरकारचें औद्योगिक-संरक्षणाबाबत-धोरण

हिंदुस्थान सरकारच्या औद्योगिक संरक्षणाबाबतच्या धोरणाविषयीं मध्यवर्ती असेंब्लीच्या चालू अधिवेशनांत गेल्या आठवड्यांत उद्बोधक चर्चा झाली. हिंदी उद्योगधंद्यांस देण्यांत येणाऱ्या संरक्षणाच्या पद्धतीचा विचार करण्यासाठीं एक समिती नेमण्यांत यावी असा ठराव पुढें मांडण्यांत आला होता. सध्या जकातींच्या द्वारें स्वदेशी धंद्यांस सहाय दिलें जातें, त्या व्यवस्थेंत सुधारणा होण्याची आवश्यकता अलीकडे प्रतिपादली जात आहे, आणि युद्धपरिस्थितींत ह्या प्रकारच्या सूचनेस महत्त्व प्राप्त झालें आहे. सरकारच्या मार्फत धंद्यांस मिळणारी मदत मोठमोठ्या कारखानदारांसच दिली न जातां लहान प्रमाणावर उद्योग करणारांसहि ती मिळावी अशी सूचना करण्यांत आली आहे. तसेंच, ज्या परिस्थितींत व ज्या अटींवर धंद्यांस संरक्षण दिलें जातें त्या परिस्थिति व अटी ह्यांचा फेरविचार करणें अगत्याचें आहे असें सांगण्यांत येत आहे. उदाहरणार्थ, आपणांस लागणारा कच्चा माल बाहेरून आणणाऱ्या धंद्यांस संरक्षण दिलें जात नाहीं. परंतु विशिष्ट परिस्थितींत कांहीं होतकरू स्वदेशी धंद्यांस कच्चा माल बाहेरून आणणें अपरिहार्य होतें ही गोष्ट ध्यानांत बाळगली जाणें अगत्याचें आहे. हिंदुस्थान सरकारच्या वतीनें सर रामस्वामी मुदलियार ह्यांनीं चर्चेमध्यें पुढें आलेल्या सूचनांविषयीं सहानुभूति व्यक्त

केली. युद्ध चालू असतांना खर्चविषयक प्रश्नाची चौकशी करण्यास समिति नेमणें अव्यवहारिक आहे असें म्हणून युद्ध समाप्तीनंतर सरकारच्या औद्योगिक संरक्षणाबाबतच्या धोरणाचा सांगोपांग विचार होणें अपरिहार्यच होईल असं त्यांनीं सांगितलें. कच्च्या मालाची आयात करणाऱ्या विशिष्ट धंद्यांस आजहि संरक्षण देण्यांत येत असल्याचा दाखला त्यांनी दिला आणि स्वदेशी धंद्यांची जोपासना युद्धोत्तर काळांत अवश्य केली जाईल असें आश्वासन पूर्वी देण्यांत आलें आहे त्याची पुनरुक्ति केली.

## साखर-समितीची दिल्ली येथें बैठक

इंपीरिअल कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चच्या साखर समितीची सभा दिल्ली येथें गेल्या ७ तारखेस भरली होती. समितीचें अधिवेशन एकच दिवस झालें. पण साखरेसंबंधानें चाललेल्या संशोधनकार्याचा आढावा त्यांत घेण्यांत आला. निरनिराळ्या क्षेत्रांत व भिन्न भिन्न ठिकाणीं उसाच्या सुधारणेविषयीं संशोधनात्मक प्रयत्न चालले आहेत. त्यांच्या वृत्तांताची चर्चा होऊन त्यांचे बाबतींत विधायक सूचना करण्यांत आल्या. आपल्या इकडील पढेगांव येथील क्षेत्राचा विस्तार केला जावा अशी सूचना समितीपुढें मांडण्यांत आली होती. परंतु पैशाच्या अभावीं नवीन व खर्चाचें काम हातीं घेणें अशक्य असल्याचें सांगण्यांत आल्यावरून तिचा विचार स्थगित झाला. शास्त्रीय संशोधनाचा व्यावहारिक उपयोग ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांस होऊन उसाची किंमत व पर्यायानें साखरेचा भाव ह्यांमध्यें घट होण्याची आवश्यकता प्रतिपादण्यांत आली आणि ह्या संबंधांतली माहिती पद्धतशीरपणानें प्रसिद्ध केली जावी आणि हिंदुस्थान सरकारनें उंसांत सुधारणा होण्यास लागणारें द्रव्यसहाय द्यावें ह्या अर्थाचा ठराव समितीनें मान्य केला. उसाची लागवड झपाट्यानें वाढत आहे, ह्यामुळें गूळ व साखर ह्यांच्या धंद्यांचे मार्गांत अडचणी येत आहेत, त्यांवरहि उपाय शोधण्यांत यावा असें मत व्यक्त करण्यांत आलें. युद्धपरिस्थितीमुळें सरकारचें द्रव्यसहाय भरपूर प्रमाणांत संशोधन कार्यास मिळूं शकत नाहीं हें स्पष्ट झाल्यानें त्याच्या विस्ताराचा प्रश्न मागें पडत आहे. तथापि, हातीं घेतल्या गेलेल्या योजनांची प्रगति चालू रहाण्याची व्यवस्था झाली आहे.

## इंग्लंडमध्यें छोट्या चलनी नोटांची तरतूद

धातूंच्या नाण्यांचे ऐवजीं व्यवहारांत कागदी चलनाचा उपयोग करणें नेहमीच राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें हितावह असतें. नोटा वापरण्यास सोयीच्या असतात आणि त्यांचे योगानें चांदी-सोन्याच्या मोलवान धातूंची बचत होते. ही सोय युद्धकाळांत विशेष महत्वाची ठरते. हिंदुस्थानांत रुपयांच्या नाण्यांचे ऐवजी जनतेनें नोटा वापरणें कसें इष्ट आहे ह्याचें विवेचन आम्ही मागें केलें आहे. एक रुपया किंमतीच्या नोटा सरकारनें प्रचलित केल्या असल्याकारणानें रुपयाच्या नाण्यास बाजवीपेक्षा अधिक मागणी करण्याचें प्रयोजन लोकांस उरलेलें नाहीं. हिंदी जनतेमध्यें कांहीं काळपर्यंत नोटांचे बाबतींत पसरलेला गैरसमज दूर झालेला असून तिचें चलनाचें कार्य व्यवस्थित रीतीनें भागत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ह्या संबंधांत इंग्लंडमध्यें सावधगिरीची तरतूद करण्यांत आली आहे ती लक्षांत घेण्यासारखी आहे. युद्धाच्या धडामोडींत चांदीचीं किरकोळ नाणीं टांकसाळींत पाडलीं जाऊन त्यांचा पुरवठा होणें कठिण किंवा अशक्य झालें तर त्यांची जागा घेण्यास लहान किंमतीच्या नोटा इंग्लंडमध्यें छापून तयार ठेवण्यांत आल्या आहेत. विशेष अडचणीचा प्रसंग उद्भवला तरच त्या प्रचलित केल्या जातील. बँक ऑफ इंग्लंडच्या प्रचलित असलेल्या एकूण नोटांच्या किंमतीच्या मानानें (८०० कोटि रुपये) ह्या छोट्या नोटांची किंमत अत्यंत अल्प असेल. ह्या व्यवस्थेचे फायदे खालीं दिल्याप्रमाणें होतील असें मत एका ब्रिटिश बँकरनें व्यक्त केलें आहे. (१) ह्या नोटांचे योगानें नाण्यांच्या पुरवठ्यास पुस्ती जोडली जाईल; (२) नाण्यांपेक्षा नोटांची वहातुक करणें अधिक सोपें असतें; (३) नोटा छापण्याचा खर्च थोडा असतो आणि त्यांचे योगानें धातूंच्या वापरांत बचत होते; आणि (४) युद्धसमाप्तीनंतर फाजील चांदीचीं नाणीं व्यवहारांतून काढून घेण्यापेक्षा चलनी नोटा परत आणणें अधिक सोपें होईल. युद्धाच्या काळांत चलनी नोटांचा उपयोग करणें कसें सोयीचें व फायदेशीर आहे हें ह्यावरून ध्यानांत येईल.

## मुंबईतील हिंदी ख्रिस्ती समाज

ख्रिस्ती-लोक मुंबई शहरांत कोणकोणत्या प्रांतांमधून येतात हें खालील तक्त्यावरून कळेल.

| प्रांत | एकंदर कुटुंबें | शेकडा |
|---|---|---|
| पुणें | २२ | ४ |
| नगर | २५४ | ४५·४ |
| नाशीक | ११ | १·९ |
| सातारा | ११ | १·९ |
| कोंकण | ७ | १·२ |
| सोलापूर व बेळगाव | १·३ | २·३ |
| कोल्हापूर | १६ | २·८ |
| निजाम संस्थान | ७० | १२·५ |
| महाराष्ट्रांतील इतर प्रांत | १० | १·८ |
| बडोदा | ५ | ·९ |
| अहमदाबाद | ९ | १·६ |
| गुजराथमधील इतर प्रांत | ४४ | ७·९ |
| मध्यप्रांत | १९ | ३·४ |
| संयुक्तप्रांत | २६ | ४·६ |
| हिंदुस्थानांतील इतर प्रांत | ४३ | ७·८ |

तपासणी केलेल्यापैकीं शेकडा ७५ लोक महाराष्ट्रांतून (निजाम संस्थानासह), शेंकडा १० गुजराथेमधून, १५ इतर प्रांतांतून आलेले आढळतात. —"ज्ञानोदय"वरून


# महिलांचें भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

# प्रांतिक सहकारी बँक ही शेतकऱ्यांचीच बँक आहे.

[ मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या लासलगांव येथील उपशाखेच्या उद्घाटनसमारंभाचे प्रसंगीं बँकेचे अध्यक्ष, श्री. सरय्या ह्यांचें लेखी भाषण वाचून दाखविण्यांत आलें, त्याचा गोषवारा खालीं दिला आहे. ]

"बँक म्हणजे काय असतें हें जरी सविस्तरपणें येथें सांगणें शक्य नाहीं, तरी पण त्यांची थोडकीशी माहिती देणें जरूर आहे. ज्याप्रमाणें कांहीं लोकांना कर्ज काढण्याची जरूरी असते, त्याचप्रमाणें कांहीं लोकांना कर्ज देण्याची शक्ति व इच्छा असते. परंतु ह्या दोन्ही वर्गांची माहिती एकमेकांना असते असेंच नाहीं. म्हणजे बँक हा ह्या दोन्ही वर्गांची सांगड घालणारा एक दुवा म्हटलें तर चालेल. त्याचप्रमाणें ज्या लोकांना पैसा घरीं सांठवून ठेवण्याची संवय असते व असा पैसा पुरून ठेवला गेल्यामुळें देशाची जी नुकसानी होते ती टाळण्याकरितां एक सुरक्षित जागा ह्या दृष्टीनें व कांहीं मोबदला मिळण्याचें एक साधन म्हणून बँकांचा उपयोग होतो. तसेंच लोकांनीं काटकसर करून कांहींतरी सांठवावें व जरूर त्यावेळीं व अडचणीचे प्रसंगीं सदरहु रकमेचा त्यांना उपयोग व्हावा अशा प्रकारची योजना बँका सेव्हिंग्ज ठेवखातीं उघडून करतात शिवाय सांठविलेला पैसा कोणत्या धंद्यांत ( कोणत्या कंपनीचे भागांत कोणत्या प्रकारचे सरकारी व तत्सम कर्जरोख्यांत वगैरे ) घालावा याबद्दल सल्ला देऊं शकतात. स्वतःजवळ पैसा बाळगून रोखीनें व्यवहार करण्यापेक्षां ज्या वेळीं तो लागेल त्यावेळीं काढतां येऊन चिठीचपाटीनें पैशाची देवघेव करण्याची सोय बँका चालू ठेवखातीं स्वीकारून करतात. इतकेंच नव्हे तर पैसा एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठविणें किंवा आणणें म्हणजे आपण हुंडीचा व्यवहार ज्याला म्हणतों तोही त्या करतात. वर म्हटल्याप्रमाणें योग्य इसमांस व योग्य धंद्याकरितां अगर कारणाकरितां रीतशीर नफ्यानें ( व्याजानें ) कर्जेहि बँका देऊं शकतात. वरील प्रमाणें ठेवी स्वीकारणें व हुंडीचिठीचें काम आपली बँक येथें करील. मात्र कर्ज देण्याचे बाबतींत ती तें सहकारी संस्था ह्यांसच देऊं शकेल व शेतकऱ्यांचें हित पर्यायानें होऊं शकेल. अशा कामाकरितां म्हणजे शेतकी मालाच्या अगर शेतीला लागणाऱ्या वस्तूंच्या तारणावर इतरांनाहि कर्जे देईल. आपल्या बँकेसंबंधीं येथें विशेष अशी एक गोष्ट नमूद करणें मजला अवश्य वाटतें व ती ही कीं, कर्ज देतेवेळीं आपल्या पैशाची सुरक्षितता आहे एवढेंच पाहून तिला चालत नाहीं तर ज्यांना कर्ज द्यावयाचें, त्यांचें हित व फायदा ज्या कारणाकरितां कर्ज द्यावयाचें त्यापासून होण्यासारखा आहे किंवा नाहीं हें पहावें लागतें. ह्यावरूच ही संस्था सावकारी पद्धतीची नसून ती कर्जाऊ रक्कम घेणाऱ्यांचीच आहे व परकी नव्हे हें सिद्ध होत आहे. म्हणूनच मी म्हणतों कीं, ही बँक तुमचीच आहे व त्या भावनेनेंच तुम्ही तिच्याकडे पहाल अशी माझी आशा, नव्हे खात्री आहे.

"नाशिक येथील सहकारी मध्यवर्ती बँक बंद करावी लागल्यामुळें तिला जोडलेल्या सहकारी पेढ्यांची पैशाच्या अभावीं बरीच गैरसोय झाली. तरी ही गैरसोय शक्य तितकी दूर करावी ह्या दृष्टीनें आमच्या बँकेनें असें ठरविलें कीं, ज्या सोसायट्या साधारणपणें बऱ्या चालल्या आहेत त्यांस पैसा पुरवावा. अशा सोसायट्या आरंभीं थोड्याच निवडल्या गेल्या. ह्या सोसायट्यांपैकीं मोठा भाग निफाड तालुक्यांत आहे व त्याकरितां बँकेची शाखा अगर उपशाखा नाशिक येथें न उघडतां निफाड अगर ह्या तालुक्यांतील एकाद्या मध्यवर्ती व बाजाराचे ठिकाणीं ती उघडावी हें योग्य होय. त्याचप्रमाणें ह्या बँकेखालील येवला तालुक्यांतील सोसायट्यांची सोय करतां आली तर पहावी असेंहि वाटत होतें. म्हणून लासलगांव हें ठिकाण निवडावेंसें वाटलें. तसेंच तें मोटारीच्या व रेल्वेच्या दृष्टीनेंही सोयीचें आहे. कळवण, येवला, कोपरगांव व निफाड ह्यांतील बऱ्याच गांवांची लासलगांव ही विशेषेंकरून भुसार मालाची बाजारपेठ आहे. शेतकरी लोकांस सहकारी पतपेढी ही जितकी आवश्यक व फायदेशीर आहे तितकीच अगर जास्त सहकारी माल खरेदीविक्रीची सोय असणेंही जरूर आहे. त्याचप्रमाणें जरूर भासल्यास माल सांठविण्याची व माल विकेपर्यंत तात्पुरत्या गरजा भागविण्याकरितां पैसा मिळेल अशी व्यवस्था असणें जरूर आहे. ह्याकरितां येथें एक सहकारी खरेदीविक्री संघ आहे. हा संघ यशस्वी रीतीनें चालण्यास शेतकऱ्यांनीं आपला माल ह्या संघामार्फत विकणें हें तर जरूर आहेच परंतु अशा मालाची विक्री करण्याकरतां अगर तात्पुरतें मालाच्या तारणावर कर्ज देण्याकरतां पैशाचीही जरूरी आहे व असा पैसा तावडतोब मिळण्याची व्यवस्था व्हावी ह्याकरितां बँकेनें आपली शाखा लासलगांव येथें काढावी अशी मागणी येथील सहकारी खरेदीविक्री संघानें केली आहे. इतकेंच नव्हे तर त्याकरतां बँकेच्या उपशाखेची सोय शक्य तितकी करण्याचें त्यांनीं कबूल केलें आहे. शेतकऱ्यांनीं पिकविलेला माल हा हंगामी तयार होत असून तो सबंध वर्षांत खपावयाचा असतो. त्याचें उत्पादन औद्योगिक कारखान्यांप्रमाणें वेळोवेळीं होणें शक्य नसल्यामुळें शेतकी मालाचा सांठा करणें क्रमप्राप्त आहे. शिवाय असा सांठा जितका स्थानिक करतां येईल तितका त्यावरील कोठारभाडें, मुकादमी वगैरेचा खर्च कमी होईल व त्या प्रमाणांत उत्पादन करणारा व प्रत्यक्ष माल खाणारा ह्यांत तो वाटणीस कमी येईल व स्वस्त पडेल व फायदेशीर ठरेल अशा प्रकारचा सांठा करण्याकरितां पैशाची सोय, मोठे शेतकरी व व्यापारीवर्ग ह्यांस पाहिजे असते. इतकेंच नव्हे तर अशा व्यवहारांत माल दाखविणें, जसा जसा लागेल तसा तसा सोडवून देणें वगैरे कित्येक सोयीची व्यवस्था होणें जरूर असतें. ह्या सर्व सोयी स्थानिक बँकर असल्याशिवाय होऊं शकत नाहींत, कारण गिऱ्हाइकांची पत अगर वागणूक ही लांबवरच्या शहरीं बँकर्सना सहज कळूं शकत नाहीं व ती अजमावण्याकरितां लागणारा खर्च मोठ्या प्रमाणावर धंदा असल्याशिवाय जमत नाहीं. अशा प्रकारच्या माल सांठविण्याकरतां लागणाऱ्या सोयी व सवलतींचा फायदा अखेर शेतकरी लोकांस त्यांच्या मालास चांगली किंमत मिळण्यांत होतो.

"व्यापारीवर्गास हुंडी-चिठ्ठीची स्थानिक व्यवस्था असणें किती जरूर आहे हें मी येथें सांगण्याची जरूरी नाहीं. व्यापारीवर्गांची मालाचे तारणांवरील कर्जांची, हुंडी चिठी वगैरेची सोय झाल्यास त्यांचा फायदा होईल; व्यापारी संख्या वाढेल व बाजारपेठही भरभराटीस येईल. ह्या रितीनें व्यापारी वर्गाचा फायदा झाल्यास शेतकऱ्यां-

चाहि माल वेळेवर व स्थानिक ठिकाणीं खपेल, व मालास थोडा-बहुत जास्त भाव मिळेल. म्हणजे प्रत्यक्ष रीतीनें व्यापारी वर्गाचें हित म्हणजेच शेतकऱ्यांचें हित होय, म्हणून शेतकऱ्यांची जी आमची सहकारी बँक हिनें सोसायट्या, खरेदी-विक्रीसंघ व व्यापारी वर्ग ह्या सर्वांच्या सोयी करतां लासलगांव येथें एक उपशाखा आज उघडण्याचें ठरविलें आहे तरी आपण सर्वांनीं तीस हातभार लावून सहकार्य कराल अशी विनंति आहे.

"शेतकऱ्यांनीं उत्पादनाकरितांच, त्याप्रमाणें शेतीकरतांच व परत फेडीच्या ऐपतीच्या आंत कर्ज काढून व तें स्वतःच्या व आपल्या शेतकरी बंधूंच्या हिताकरितां अगदीं वेळेवर फेडून व इतरांनीं आपल्या ठेवी ठेऊन, ज्यायोगें आपल्या शेतकरी बंधूंचें व थोडेंबहुत आपलेंहि हित होणार आहे त्याकरितां, ही आपल्या बँकेची येथील उपशाखा चिरकालीन होईल अशी व्यवस्था राखाल अशी मला उमेद आहे."

## मालाच्या आगबोटींची वहातुक

### तुलनात्मक परिस्थिति

आगबोटींच्या वहातुकीचे संबंधांत हिंदुस्थान अत्यंत मागसलेला आहे. माल वहातुकीच्या सर्व हिंदी आगबोटी एकूण २३ लक्ष टनांच्याहि नाहींत. म्हणजे, दर मणाशीं सरासरी ·०००६ टन पडतें. खालील, युद्धपूर्व तुलनात्मक आकडे ह्या परिस्थितीवर उत्कृष्ट प्रकाश पाडतील:—

| देश | लोकसंख्या (लक्ष) | किती टनांच्या आगबोटी (हजार टन) | दर मणाशी टनेज | हिंदी सरासरीच्या कितीपट |
|---|---|---|---|---|
| ग्रेटब्रिटन | ४७१ | १७,५४४ | ·३७ | ६१७ |
| डेन्मार्क | ३७ | १,११८ | ·३० | ५०० |
| नॉर्वे | २९ | ४,२४८ | ·१५ | २५० |
| रशिया | १६८० | १,२४८ | ·००७ | ११७ |
| जपान | ७१२ | ४,७४५ | ·०६ | १०० |
| जर्मनी | ६८० | ३,९३७ | ·०६ | १०० |
| स्वीडन | ६२ | १,५०२ | ·०२ | ३५ |
| हिंदुस्थान व सिलोन | ३७६७ | २१५ | ·०००६ | १ |

निदान हिंदी किनाऱ्यावरील आगबोटींची वहातुक तरी हिंदी मालकीच्या कंपन्यांकडे असावी, परंतु आज फक्त २०% माल व ८% उतारू पूर्ण स्वदेशी मालकीच्या आगबोटींतून प्रवास करतात, अशी वस्तुस्थिति आहे.

---

### हिंदी कोळशाचा इजिप्तमध्यें खप!

इजिप्तमध्यें युरोपातून कोळसा येणें ह्यापुढें कठीण झालें असल्याकारणानें, तेथें हिंदी कोळशाचा उठाव कसा करतां येईल, ह्याचा विचार चालू आहे. वहातुकीची अडचण वहातुकीचे भारी दर व कोळशाची सरकारनें निश्चित केलेली अल्प किंमत ह्यामुळें हिंदी कोळशाच्या निर्गतीस प्रोत्साहन मिळत नाहीं.

सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोपाचें कापड (Casement cloth) दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड
सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे
मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.
मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

दि बँक ऑफ इंडिया लि.
[स्थापना: १९०६]
अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१३,००,०००
मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.
मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.
इतर शाखा: अहमदाबाद (भद्र ऑफिस), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.
लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.
डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. (रजेवर), मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. केराई.
करंट डिपॉझिट अकाउंटस:
दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रकम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रकावरून.
विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.
बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.
एजंट—डी. आर. कालवाणी.

### मध्यप्रांत वऱ्हाडमधील सहकारी बँकांतील ठेवी: एक सूचना
( लि. आ. म. )

मध्यप्रांत-वऱ्हाडमधील सेंट्रल बँकांतील ठेवीदारांच्या ठेवीबाबतचा प्रश्न प्रांतिक सरकार सलोख्यानें विचार करून जर सोडवील तर जनतेला बरेंच समाधान वाटेल. बऱ्याच मोठ्या संख्येनें मोजण्याइतकी रक्कम जनतेनें वऱ्हाडांतील सेंट्रल बँकांत डिपॉझिट (ठेवी म्हणून) ठेविली होती. ती आज त्या बँकांतून मिळत नाहीं असा सारखा गाजावाजा चालला आहे. हाडाचीं काडें करून व पोटाला पीळ देऊन साधारण स्थितींतील जनतेनें आपल्या अनाथ मुलामुलींसाठीं किंवा पत्नीसाठीं, किंवा आपल्या थकत्या काळासाठी जमवून ठेविलेली अशी ती बरीच रक्कम आहे. भासत असलेली ही अडचण दूर होण्याच्या विश्वासावरच आजपर्यंत सर्व जनता होती; पण वाट किती दिवस पहाणार? जबाबदारी सरकारवर थोड्या-अधिक प्रमाणांत पडते, व आजहि जर खालील विचार प्रांतिक सरकार किंवा देशांतील धनिक लोक करतील तर अशा व्यवहारांत गुंतविलेला पैका सहज व्याजासह वसूल होऊं शकेल.

आज सेंट्रल बँकांजवळ बरीच जमीन गहाण आहे. त्या सर्व जमिनीवर सेंट्रल बँकांचा मालकीतावा आहे. तेव्हां सरकारनें या सर्व सेंट्रल बँकांना पूर्ण रक्कम कर्जाऊ देऊन व ठेवीदारांस त्यांच्या ठेवी परत करण्यास लावून त्याच लोकांना त्याच पैशांत शेतांच्या किंमती ठरवून त्यांना त्या विकत घेण्यास लावावें; अशा योगानें लोकांचा पैसा परत दिला जाईल व त्या सर्व जमिनी कर्जांतून मोकळ्या होतील. कारण कितीतरी जमीनी पैशाकरितां पडीत पडल्या आहेत. शिवाय जनतेचा पैसा परत केल्याचें पुण्य पदरीं पडून लोकांचा सहकारी बँकांवर विश्वास कायम राहील. या गोष्टीची चळवळ आमचे ठेवीदार करतील तर त्यांचा फायदा होईल अशी आमची खात्री आहे. सरकार ही गोष्ट करण्यास जर असमर्थ असेल तर देशांतील धनिक लोकांनीं याचा अवश्य विचार करावा. आपला पैका अल्प व्याजानें गुंतविण्यापेक्षां वरील व्यवहारांत, एकदोन वर्षांकरितां गुंतविला तर त्याची रक्कम पुरेपूर व्याजासह त्यांना परत मिळेल, असा आत्मविश्वास आहे. मात्र प्रयत्न करणारा ठेवीदारवर्ग आज पाहिजे व तो विचार अमलांत आणण्यास तितक्या कोटींतील अधिकारीवर्ग पाहिजे.

### खनिज पदार्थांचें व धातूंचें उत्पादन

सन १९३८ मध्यें हिंदुस्थानांत खनिज पदार्थांचें व धातूंचें एकूण उत्पादन ३४ कोटि, १४ लक्ष रुपयांचें झालें. १९३७ सालाच्या उत्पादनाची किंमत ३० कोटि, ४९ लक्ष रुपये भरली होती. म्हणजे, उत्पादनांत १२% वाढ झाली. खालील तक्ता ह्या उत्पादनाच्या महत्त्वाच्या बाबींची वर्गवारी दर्शवितो:—

| खनिज पदार्थ, धातू इ. | १९३७ लक्ष रु. | १९३८ लक्ष रु. | वाढ-घट % |
|---|---|---|---|
| कोळसा | ७८१ | १०६४ | +३६.२ |
| पोलाद | ६६८ | ६९६ | + ४.२ |
| मँगेनीज | ४३० | ३९३ | − ८.५ |
| लोखंड | २८३ | ३४४ | +२१.७ |
| सोनें | ३०४ | ३०४ | — |
| पेट्रोलियम | १३७ | १६५ | +२०.७ |
| मायका | १४४ | ११३ | −२१.१ |
| मीठ | ८१ | ९५ | +१६.८ |
| तांबें | ६१ | ४४ | −२८.६ |

### हिंदी ब्रॉडकास्टिंगची प्रगति

तीन हिंदी गवयांच्या चार तासांच्या बैठकीस १०० रुपये, एक तासाच्या एका युरोपिअन कार्यक्रमास ६५ रुपये, ४५ मिनिटांच्या तीन भाषणांस ६५ रुपये, एक तासाच्या नाटकास ४५ रुपये, ४५ मिनिटांच्या हिंदी ऑर्केस्ट्राला २० रुपये, भूमिजनांच्या एक तासाला २० रुपये, ३० मिनिटांच्या शालेय कार्यक्रमास १० रुपये आणि इतर कार्यक्रमास १० रुपये ह्याप्रमाणें प्रत्येक मोठ्या ब्रॉडकास्टिंग केंद्रांस दर दिवसास खर्च येतो.

आज हिंदुस्थानांत सात मुख्य नभोवाणी केंद्रें असून इतर बारा लहान केंद्रें आहेत. १९३८-३९ असेर पुऱ्या होणाऱ्या नऊ वर्षांत आयात-जकात, परवाना फी व रेडियो मासिकांतील जाहिराती या सर्वांचें एकूण उत्पन्न १,००,४४,७९८ रुपये झालें; त्यांपैकीं ७७,४४,८४८ रुपये खर्च होऊन निव्वळ नफा २२,९९,९५० रुपयांचा झाला.

१९२४ मध्यें मद्रासला स्थापन झालेल्या रेडियो क्लबचा हा विस्तार प्रशंसनीय आहे. ब्रॉडकास्टिंगची खरी संघटित सुरवात १९२७ मध्यें मुंबई केंद्राच्या स्थापनेनें झाली. त्यावेळीं रेडिओचा फार तर १,००० लोकांचें जवळ परवाना होता. आज त्यांच्या संख्येचा आकडा १ लाखावर गेला आहे.

तथापि अजूनहि जितक्या विविधतेनें कार्यक्रम व्हावयास पाहिजेत तितके ते होत नाहींत. हिंदी ब्रॉडकास्टिंग संस्थेला १९२९-३० मध्यें दर तासास २२० रुपये खर्च येत असे; आज केंद्रांची संख्या वाढली असल्यामुळें दर तासास १,७४३ रुपये खर्च होतात. ब्रॉडकास्टिंग संस्थेजवळ प्रत्येक केंद्रावर दर तासास ३५ रुपये खर्च करण्याइतके पैसे आहेत. परंतु पहिल्या प्रतीचे विद्वान व कलावंत रेडिओवर ऐकविण्यास लागणारा पैसा अजून मिळत नाहीं असेंच ब्रॉडकास्टिंग क्षेत्रांतील तज्ज्ञांचें मत आहे.

खेडेगांवांतील लोकांकरितां कांहीं कार्यक्रम आखण्यांत येतात. तथापि अजून त्यांना लागावी तेवढी रेडियोची गोडी लागलेली नाहीं असें दिसतें. सुमारें १०० खेड्यांतून रेडियो ऐकण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. तेथें आलेल्या अनुभवांवरून १,००० भूमिजनांपैकीं फक्त ५० च रेडियो ऐकण्याची आस्था दाखवितात असें आढळून आलें आहे. त्यांच्याकरितां आखावयाच्या कार्यक्रमाची मांडणी अधिक आकर्षक व्हावयास पाहिजे. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत, आणि समाजांतील वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत परिचय असणारी संस्था ब्रॉडकास्टिंग हीच होय; आणि म्हणूनच तिचें कार्य महत्त्वाचें आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भाषांमुळें ब्रॉडकास्टिंगचें कार्य अवघड झालें आहे, हें अर्थात कबूल करणें भाग आहे.

### दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

ह्या बँकेचें रोख भरलेलें भांडवल २४,२१० रुपये आहे. रिझर्व्ह फंड ६०० रुपये आणि बॅड डेट व कॉन्टिन्जन्सी फंड २०० रुपये आहे. बँकेकडे एकूण १ लक्ष, ८० हजारांच्या ठेवी आहेत. बँकेनें एकूण १ लक्ष, ५७ हजार रुपये कर्जाऊ दिले आहेत व १०½ हजार रुपये सरकारी रोख्यांत गुंतविले आहेत. बँकेनें रोख व इतर बँकांत मिळून ४०½ हजार रुपये ठेवले आहेत. अहवालाचे वर्षी शेअर्सची मागणी झपाट्यानें वाढली, व्याजाचे दर पूर्वीप्रमाणेंच कायम असतां ठेवींची रक्कम ३३% वाढली, वर्षअखेर एकूण नफा ३½ रुपये झाला, वगैरे माहिती रिपोर्टांत आहे. नफ्यांतून १ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत व ४०० रुपये बॅड डेट व कॉन्टिन्जन्सी फंडांत टाकून भागीदारांस द. सा. द. शे. ८॥२ टक्केप्रमाणें करमाफ डिव्हिडंड वांटण्यांत आलें. बँकेची वार्षिक सभा ता. २-१०-४० रोजीं झाली.

## मुंबई प्रांतांतील शिक्षणप्रगति

### आर्ट्स कॉलेज

सतरा आर्ट्स कॉलेजांतील ( युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड सोशिऑलजी सोडून ) विद्यार्थ्यांची संख्या ४९९ नें वाढून ती गेल्या वर्षअखेर एकूण १०७९८ झाली; गेल्या वर्षी विद्यार्थिनी १२४५ होत्या. सर्व आर्ट्स कॉलेजांवर एकंदर २६·२ लाख खर्च झाला.

### व्यावसायिक शिक्षणाचीं कॉलेजें

व्यावसायिक शिक्षणाच्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ८०६ नें वाढून ती एकंदर ४,४०३ झाली. यांपैकी १,४१५ कायद्याचे, १,३९३ वैद्यकीचे, १९७ इंजिनिअरिंगचे, २०० शेतकीचे, १,१०१ व्यापारधंद्याचे, ५८ केमिकल टेक्नॉलजीचे विद्यार्थी असून १०९ विद्यार्थी बी. टी. पदवीसाठी अभ्यास करीत होते.

### कलाशिक्षण

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स, मुंबई, या शाळेंत ६३६ विद्यार्थी होते, त्यांपैकी १०९ रे आर्ट वर्कशॉपमध्यें शिकत होते. अहमदाबाद व सुरत येथील ड्रॉइंग व डिझाइनच्या दोन्ही शाळांमध्यें अनुक्रमें ४१ व २० विद्यार्थी होते.

### अध्यापन ( ट्रेनिंग ) संस्था

पुरुषांकरितां १७ ट्रेनिंग संस्था व स्त्रियांकरितां १७ ट्रेनिंग संस्था होत्या आणि त्यांत अनुक्रमें १,१८३ व ९६४ विद्यार्थी होते. या ३४ ट्रेनिंग संस्थांपैकी १४ संस्थांची व्यवस्था सरकारी असून त्यांत १,२२७ विद्यार्थी होते आणि २० संस्था खाजगी व्यवस्थेखालीं असून त्यांत ९२० विद्यार्थी होते.

### मुसलमान

सरकारनें मान्य केलेल्या संस्थांमध्यें शिकणाऱ्या मुसलमानांच्या संख्येमध्यें १५,४४६ ची वाढ होऊन ती एकूण १,८८,२२२ झाली; यामध्यें ५१,९४४ मुली होत्या. आर्ट्स कॉलेजांत शिकणाऱ्या मुसलमानांची संख्या ३५ नें वाढून ती एकंदर ४९७ झाली आणि व्यावसायिक कॉलेजांतील संख्या ९२ नें वाढून ती एकंदर २७५ झाली. दुय्यम शाळांमध्यें विद्यार्थ्यांच्या संख्येंत १,२३१ ची वाढ होऊन ती १२,२२९ इतकी झाली. प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या संख्येंत ११,७९७ ची वाढ होऊन ती १,६९,९१२ इतकी झाली आणि खास शाळांतील विद्यार्थ्यांच्या संख्येंत ३,३२१ ची वाढ होऊन ती ५,३०९ झाली.

### इंटरमीजिएट व मागासलेले वर्ग

पुढील तक्त्यांत सरकार मान्य केलेल्या संस्थांमध्यें शिकणाऱ्या इंटरमीजिएट व मागासलेल्या वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या दिली आहे:—


| इंटरमीजिएट. | १९३७–३८ | १९३८–३९ |
|---|---|---|
| मराठे ... | २,१०,८०१ | २,२४,५५८ |
| शेतकरी वर्ग (कुणबी, कोळी वगैरे). | २,२९,०९२ | २,६१,०६७ |
| कारागीर ... | १,०६,६९२ | १,१६'९५५ |
| लिंगायत ... | ८६,३५५ | ९३,९४८ |
| एकूण ... | ६,३३,९४० | ७,१६,५२८ |
| मागासलेला वर्ग. | | |
| शेड्यूल्ड वर्ग ... | ७७,८४६ | ९२,०२६ |
| मूळच्या व डोंगरी जाती ... | ३१,३३७ | ५३,०८४ |
| इतर मागासलेले वर्ग ... | ४३,९२४ | ५०,१९६ |
| एकूण ... | १,५३,१०७ | १.९५,३०६ |


## फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं




रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. चामड्याच्या पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा बक्षिसें आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर (India.)

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११२—६ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९२—४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२—२ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९१—५ |
| २½% १९४८-५२ ... ... ... | ९५-१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०५—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१-६१ ) ... ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १३६—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १०२—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३९—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५३७—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ३½% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १२८—१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४६५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६१५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९३—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ११% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९३-१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७७३-१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४५—८ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ... | ३८—१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०८—१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४४—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६८—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. १ पै ... | १८५२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १२१-१२ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१२-3 |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६१—९ |


स्पृहणीय यश

**बोनसचे दरांत २० टक्के वाढ**

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स**

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.



**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.



**दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस**

" जौहरे हुस्न " ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांचीं गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर-Amritsar.




एजंट:—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
SHEVAK BROS.
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. दृ. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर | महिंद्रकर ब्रदर्स तयार कपड्याचे व्यापारी | बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.